परदेशातल्या प्रियजनांना राहते घराच्या चवीची ओढ,
DTDC करेल तुमच्या प्रियजनांची दिवाळी गोड...
वर्षातल्या सर्वात मोठ्या सणाला घरापासून लांब असण्याचं दु:ख आम्ही समजू शकतो...
तुमचे प्रियजन घरी येऊ शकत नसले म्हणून काय झाले? तुमच्या हातचे फराळ तर त्यांच्यापर्यंत आम्ही नक्कीच पोहोचवू शकतो. तेही अगदी माफक दरात...
आपल्या अखंड सेवेत, DTDC कुरियर, कळंब.
: अधिक माहितीसाठी संपर्क :
मो.९४०४५११५१८/८९८३८९७०८९
DTDC एक्सप्रेस कुरियर सर्व्हिसेस, कळंब
छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुल, सुनील मार्केट, गाळा नं.२७, कळंब ४१३५०७

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिध्द
बुलडाणा, शुक्रवार, दि.०१ नोव्हेंबर २०२४
वर्ष : ०४, अंक : ७९
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

## ‘समृद्धी’वर पुन्हा अपघात; तीन ठार, दोघे जखमी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, बुलडाणा :** हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात तिघे जण ठार तर चालकासह दोघे जण जखमी झाले. मृत एकाच कुटुंबातील असून त्यामध्ये आईवडील आणि मुलाचा समावेश आहे. त्यांची मुलगी आणि चालक जखमी झाले असून त्यांच्यावर सिंदखेड राजा येथील शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात येत आहे.



आज गुरुवारी, ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी भरधाव अनियंत्रित इंडिगो कार समोरून जाणाऱ्या माल वाहक वाहनाला (ट्रकला) धडकल्याने ही भीषण दुर्घटना घडली. समृद्धी द्रुतगती महामार्गाच्या नागपूर कॉरिडॉरवर चॅनेल क्रमांक ३३४.६०० जवळ हा अपघात घडला असल्याची माहिती महामार्ग पोलिसांच्या वरिष्ठ सूत्रांनी सांगितले. पोलीस उपनिरीक्षक पवार आणि त्यांचे सहकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मृतदेह बाहेर काढले. जखमींवर प्राथमिक उपचार करून सिंदखेड राजा येथे उपचारासाठी हलविले. अपघातामुळे नागपूर कॉरिडॉरवरील वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी विस्कळीत झालेली वाहतूक सुरळीत केली. अपघातग्रस्त वाहनाला ‘बॅरिगेटिंग’ करण्यात आले नंतर समृद्धीवरील वाहतूक पूर्ववत सुरू झाली.

नागपूर कॉरिडॉर वरील क्रमांक ३३४.६०० जवळ पुणे येथून अमरावतीकडे जाणाऱ्या एमएच १७ एजे ९१७३ क्रमांकाच्या इंडिगो कारने ट्रक (क्रमांक एम एच २१ बी एच ५९७६) ला मागून उजव्या बाजूने भरवेगात धडक दिली. यामुळे कारमधील प्रवाशी शुभांगी दाभाडे वय ३२ वर्ष, राजेश दाभाडे वय ४२ वर्ष हे जागीच मयत झाले. तसेच कारमधील रियांश राजेश दाभाडे वय ४ वर्ष याला रुग्णवाहिकेद्वारे उपचारसाठी नेत असताना वाटेतच मृत्यू झाला. याशिवाय समीक्षा राजेश दाभाडे आणि वाहनचालक आश्विन धनवरकर हे किरकोळ जखमी झाले आहे. त्यांच्यावर रुग्णवाहिकामध्ये औषधोपचार करण्यात आला आहे. ट्रकचालक खाजा शेख (राहणार जालना) याला सिंदखेडराजा पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

दूसरबीड येथील १०८ रुग्णवाहिकेमधील डॉ. अक्षय विघ्ने, डॉ. वैभव बोराडे, चालक शैलेश दळी, दिगांबर शिंदे यांनी जखमीवर उपचार केले. तसेच सिंदखेड राजा ग्रामीण रुग्णालयात हलवले. यावेळी बचाव कार्यामध्ये पोलीस उपनिरीक्षक पवार, पोलीस हवालदार राठोड, पोलीस जमादार किरके तसेच नाईक, पाटील, १०८ रुग्णवाहिकेचे डॉ. वैभव बोराडे व चालक शिंदे आदी सिदखेड राजा व दुसरबीड चमूतील कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.





## जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूकीत २५९ उमेदवारांचे अर्ज शिल्लक

### ३० जणांचे अर्ज बाद ; अर्ज माघारी घेतल्यानंतरच निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, अहिल्यानगर :** विधानसभा निवडणुकीसाठी जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघात २८९ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. दाखल अर्जांची काल, बुधवारी छाननी प्रक्रिया पार पडली. त्यातील फक्त ३० उमेदवारांचे अर्ज बाद करण्यात आले असून एकूण २५९ उमेदवारांचे अर्ज शिल्लक आहेत. पात्र उमेदवारांची यादी त्या त्या मतदारसंघात प्रसिध्द करण्यात आली आहे. दरम्यान, बहुतेक अर्ज वैध असल्याने आता अर्ज माघारीकडे मतदारांचे लक्ष लागले आहे.



सोमवार, ४ नोव्हेंबर रोजी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस असून सोमवारनंतरच विधानसभा निवडणुकीचे खरे चित्र समोर येणार आहे. काल, बुधवारी अर्ज छाननीत बाद झालेल्या अर्जांमध्ये डमी अर्जांचाच अधिक समावेश आहे. त्यामध्ये कोणत्याही प्रमुख उमेदवारांचा समावेश नाही. आवश्यक कागदपत्रे नसलेले अर्ज बाद झाले आहेत. बहुतेक अर्ज वैध असल्याने आता अर्ज माघारीकडे मतदारांचे लक्ष लागले. काही अर्जांबाबत हरकती आल्याने त्यावर सुनावणी रात्री उशिरापर्यंत सुरू होती. उमेदवार व हरकत घेतलेल्या व्यक्तींची बाजू वकिलांमार्फत संबंधीत निवडणुक निर्णय अधिकारी यांनी ऐकुण घेतली व त्यानंतर अर्ज वैध, अवैध याबाबत निर्णय दिला.

दरम्यान, उमेदवारांमध्ये बंडखोरांची संख्या अधिक आहे, हेच या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. अशा उमेदवारांना अर्ज मागे घेण्यासाठी प्रमुख उमेदवारांची दमछाक होणार आहे. अर्ज बाद होऊ नये, म्हणून बहुतेक उमेदवारांनी स्वतंत्रपणे वकिलाची नियुक्ती केली होती.

अर्जातील त्रृटींबाबत अधिकार्यांनाही विश्वासात घेऊन अर्ज भरले जातात. त्यामुळे अर्जात सहसा चुका दिसून आल्या नाहीत. काही अपवाद वगळता अर्ज बाद होण्यामध्ये टेक्निकल बाब असल्याचे दिसून येते. बहुतेक उमेदवार डमी अर्थही भरतात. ते अर्ज बाद केले जातात.

**वैध ठरलेले मतदारसंघानिहाय उमेदवार (कंसात अवैध)**

अकोले १३ (१), पारनेर २१ (१), संगमनेर १६ (१), शिर्डी १५ (३), कोपरगाव २० (१), श्रीरामपूर ३१(३), नेवासा २४ (०), शेवगाव ३६ (९), राहुरी २७ (३), अहमदनगर शहर २७ (३), श्रीगोंदा ३६ (५), कर्जत- जामखेड २३ (०) एकूण अर्ज २८९ (३०)

प्रमुख पक्षाच्या उमेदवारांचे अर्ज दाखल करताना विशेष काळजी घेतली असल्याचे दिसून येत आहे.

निवडणूक अर्जासोबत पक्षाचा एबी फार्म न जोडता पक्षाच्या नावाने जोडलेले अर्ज बाद करण्यात आले. जिल्ह्यात अनेक मतदारसंघात महायुती आणि महाविकास आघाडीकडून निवडणुकीसाठी इच्छुक असणाऱ्यांना उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी अपक्ष म्हणून भरलेले आहेत. ते शेवटपर्यंत आपल्या भूमिकेवर ठाम राहणार की ऐनवेळी माघार घेणार हे पहाणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## बोईसरमध्ये अज्ञात वस्तूचा स्फोट; चार जण जखमी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३१, बोईसर :** बोईसरजवळील सरावली अवध नगर येथील चाळीत रात्री उशिरा एका अज्ञात वस्तूचा स्फोट होऊन परिसर हादरला. या स्फोटात चार जण जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. स्फोटाची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तपासाला सुरुवात केली आहे.

बोईसर जवळील सरावली ग्रामपंचायत हद्दीमधील अवध नगर परिसरात असलेल्या अलशिफा गल्लीतील दुबे चाळीमधील एका खोलीत बुधवारी रात्री अकरा वाजेच्या सुमारास भीषण स्फोट झाला. या स्फोटामुळे खोलीच्या भिंती कोसळल्या असून आजूबाजूच्या घरांचे देखील नुकसान झाले आहे. स्फोटाची माहिती मिळताच बोईसर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमी झालेल्या चार जणांना रुग्णालयात हलवले. सुरुवातीला हा स्फोट सिलेंडरमुळे झाल्याचा संशय होता, मात्र अधिक तपासात खोलीतील कपाटातील संशयास्पद वस्तू किंवा फ्रिजच्या कॉम्प्रेसरचा स्फोट झाल्याचे प्रथमदर्शनी शक्यता व्यक्त करण्यात येत असून त्या दृष्टीने रात्री उशिरा घटनास्थळी वरीष्ठ पोलीस अधिकारी यांनी भेट देऊन पाहणी करून अधिक तपासासाठी फॉरेन्सिक टिमला पाचारण करण्यात आले आहे.

## बेपत्ता झालेल्या महिलेचा निर्घृण खून

### मृतदेहाचे केले सहा तुकडे

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३१, जोधपूर :** राजस्थानच्या जोधपूर येथून दोन दिवसांपूर्वी बेपत्ता झालेल्या ५० वर्षीय ब्युटिशियन महिलेचा मृतदेह छिन्नविछिन्न अवस्थेत आढळून आला आहे. एका प्लास्टिक पिशवीत महिलेचा मृतदेह आढळला आहे. सदर महिलेच्या मृतदेहाचे सहा तुकडे केले असल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपीने आपल्या घराशेजारीच महिलेचा मृतदेह पुरला होता. दिवाळीच्या दिवसात मृत महिलेच्या कुटुंबियांवर शोककळा पसरली आहे. तसेच संशयित आरोपी गुल मोहम्मद यानेच हा खून केला असल्याचे आरोपीच्या पत्नीने सांगितले असून पोलीस गुल मोहम्मद नावाच्या आरोपीचा शोध घेत आहेत.

२८ ऑक्टोबर रोजी मृत महिला अनिता चौधरी बेपत्ता झाली होती. तिच्या ब्युटी पार्लर जवळून दुपारच्या दरम्यान ती हरवली. संध्याकाळपर्यंत घरी न परतल्यामुळे दुसऱ्या दिवशी तिचा पती मनमोहन चौधरीने जोधपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत गुलामुद्दीन उर्फ गुल मोहम्मदवर पोलिसांना संशय आला. अनिता चौधरी यांचे ब्युटी पार्लर असलेल्या इमारतीमध्येच गुलचेही दुकान आहे. दोघेही एकमेकांना ओळखत होते. पीडित महिलेच्या कॉल डिटेल्समधूनच पोलिसांना गुल मोहम्मदवर संशय आला होता. सरदारपुरा पोलीस ठाण्यातील अधिकारी दिलीप सिंह राठोड यांनी सांगितले की, बेपत्ता होण्यापूर्वी अनिताने दुकानाबाहेरून रिक्षा पकडली होती. पोलिसांनी सदर रिक्षावाल्याचा शोध घेऊन चौकशी केली असता त्याने सांगितले की, पीडित महिलेला आरोपीच्या घराजवळ सोडले होते. पोलिसांनी जेव्हा आरोपी गुल मोहम्मदचे घर गाठले, तेव्हा गुल मोहम्मदची पत्नी घरी होती. तिने सांगितले की, ती तीन दिवस तिच्या बहिणीच्या घरी गेली होती.

बहिणीच्या घरून परतल्यानंतर मोहम्मदने तिला अनिताबद्दल सांगितले. तिला मारून तिचा मृतदेह प्लास्टिक पिशव्यात घराच्या मागे पुरला आहे. पोलिसांनी बुलडोझर बोलावून घराच्या मागे १२ फुटांचा खड्डा खणल्यानंतर त्यांना छिन्नविछिन्न अवस्थेतील मृतदेह आढळून आला.

मृत महिला अनिताच्या मुलाने सांगितले की, मोहम्मदने त्याच्या आईची फसवणूक करून तिचा खून केला. पीडित महिलेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. तसेच पोलिसांनी जोधपूरमध्ये ठिकठिकाणी छापा टाकून आरोपीचा शोध सुरू केला आहे.

## सावधान ! दिवाळीत मिठाई विक्रेत्यांकडून ग्राहकांची लूट

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, नागपूर :** दिवाळीत मोठ्या प्रमाणावर मिठाईसह इतर पदार्थाची विक्री होते. या काळात काही विक्रेते अवास्तव नफा कमावण्यासाठी एकीकडे भेसळ तर दुसरीकडे ग्राहकाला मिठाई डब्यात ठेवून त्याचे वजन करून विकतात. त्यामुळे मिठाईच्या दरात डब्याचीही ग्राहकाला विक्री होते. या फसवणुकीबाबत अ. भा. ग्राहक पंचायतने बरेच मुद्दे मांडले आहे. त्याबाबत आपण जाणून घेऊ या.

दिवाळीमध्ये काही विक्रेते मिठाई, तेल, तुप, खोवा व इतर खाद्यपदार्थामध्ये जास्त नफा कमावण्यासाठी मोठ्या प्रमाणात भेसळ करून नागरिकांच्या जिवांशी खेळतात. या काळात मिठाईसह इतर खाद्य पदार्थाची कोट्यावधींची उलाढाल होते. या पदार्थात भेसळ करण्याचे प्रमाण वाढत असून यावर अंकूश ठेवण्यासह कारवाईची जबाबदारी अन्न व औषधी प्रशासनाची आहे. परंतु थातूर मातूर कारवाई करन वेळ काढला जातो. या भेसळीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. दरम्यान जिल्हाधिकारी अध्यक्ष असलेल्या जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकांमध्ये वारंवार ग्राहक पंचायतने आवाज उठविल्यावरही थातूर- मातूर कारवाईतून नागरिकांच्या तोंडाला पाने पुसल्या जात असल्याची खंतही अ. भा. ग्राहक पंचायतने प्रसिद्धीपत्रकातून व्यक्त केली. नियमाप्रमाणे विक्रेत्याने फक्त मिठाईचे वजन करुन नंतर ते स्वत:च्या दुकानाची जाहीरात करणाऱ्या डब्यामध्ये ठेवून ग्राहकांना दिले पाहिजे. परंतु विक्रेते डब्यांमध्ये मिठाई ठेवून वजन करून ग्राहकाला देतात.



त्यामुळे मिठाईच्या दरात डब्याची विक्री होऊन ग्राहकाची फसवणूक होत आहे. एका डब्याचे वजन साधारण ५० ते १०० ग्रॅम असते म्हणजे एवढी एवढी मिठाई ग्राहकांना कमी दिली जाते. हा गंभीर प्रकार असतानाही वजनमाप खाते (वैधमापन शास्त्र विभाग) केवळ तमाशा बघतो.

तातडीने ग्राहकांची फसवणूक टाळण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभाग आणि वैधमापन शास्त्र विभागाकडून अस्थापनांची तपासणी करून दोषींवर कडक कारवाई करायला हवी, अशी मागणी अ. भा. ग्राहक पंचायतचे पश्चिम क्षेत्रीय संघटन मंत्री गजानन पांडे यांनी केली. कारवाई न झाल्यास कारवाईचा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान अन्न व औषध प्रशासन विभाग आणि वजनमाप खाते सतत वर्षभर वादग्रस्त आस्थापनांची तपासणी न करता केवळ सनासुदीतच थातूर मातूर कारवाई करत असल्याने विक्रेते आणि संबंधित विभागाचे साटेलोटे तर नाही ना, असा संशयही अ. भा. ग्राहक पंचायतचे ॲड. स्मिता देशपांडे, शीपाद भटटलवार, संजय धर्माधिकारी, गणेश शिरोळे, ॲड. विलास भोसकर, तृप्ती आकांत, संध्या पुनियानी, ॲड. गौरी चांद्रायण आणि इतरही पदाधिकाऱ्यांनी केला.




## बाजाराचा उत्साह टिकेल का ?

गेल्या आठवड्यातील बाजार रंगमध्ये अमेरिकी मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्हने केलेल्या व्याजदर कपातीबाबत थोडक्यात लिहिले होते. आज तोच धागा पकडून पुढे जाऊया. रिझर्व्ह बँकेच्या धोरणाने नेमके काय साध्य होते? हे शेअर बाजारात गुंतवणूक करणाऱ्या प्रत्येक सुजाण गुंतवणूकदाराला माहीत असणे आवश्यक आहे.

अर्थव्यवस्थेत चलन म्हणजेच, पैशाचा पुरवठा सुरळीतपणे चालू ठेवणे हे रिझर्व्ह बँकेचे प्रमुख कार्य आहे. रिझर्व्ह बँकेने हे कार्य करण्यासाठी कोणकोणती आयुधे वापरायची हेदेखील निश्चित केले असते. त्यातील सर्वात महत्त्वाचे म्हणजे रेपो रेट. रेपो रेट म्हणजे जेव्हा बँकांना कर्ज देण्यासाठी पैशाची गरज भासते, तेव्हा त्या तात्पुरत्या स्वरूपात रिझर्व्ह बँकेकडून पैसे मिळायची सोय करून दिलेली असते अर्थातच यासाठी रिझर्व्ह बँकेकडून व्याज आकारले जाते. रिझर्व्ह बँकेने या व्याजदरात वाढ केली तर, बँकांच्या कर्ज घेण्याच्या क्षमतेत घट होते. सोप्या भाषेत व्याजदर वाढले तर बँकांनाही कर्जावरचे व्याजदर वाढवावे लागतात व याचा परिणाम महागाईवर होतो. म्हणजेच महागाई नियंत्रणात ठेवणे आणि अर्थव्यवस्थेतील चलनाचा पुरवठा नियंत्रणात ठेवणे या दोघांमध्ये परस्पर संबंध आहे.

रिझर्व्ह बँकेला हा निर्णय घेणे परिस्थितीनुसार ठरवावे लागते की, व्याजदरात कपात करायची किंवा आहेत ते दर 'जैसे-थे' ठेवायचे किंवा व्याजदरात वाढ करायची. गेल्या दोन वर्षाच्या काळात सकल देशांतर्गत उत्पादनातील (जीडीपी) वाढ अधिक राहिल्याने अर्थव्यवस्था तेजीत असल्याचाच परिणाम म्हणून महागाईच्या झळाही जाणवू लागल्या. यामुळेच रिझर्व्ह बँकेला व्याजदर कपात सहसा सहजी करता येणे कठीण होते. येत्या आठवड्यात रिझर्व्ह बँकेची व्याजदर ठरवणारी समिती यावर कोणता निर्णय घेते हे पाहणे आवश्यक आहे. रिझर्व्ह बँकेच्या व्याजदर कपात किंवा वाढ या संदर्भातील निर्णय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर घेऊ शकत नाहीत. सहा सदस्यीय पतधोरण समिती हा निर्णय घेत असते. गेल्या वेळेच्या समितीच्या बैठकीत व्याजदर कपातीला आता सुरुवात केली पाहिजे, अशा प्रकारचा सूर नोंदवला गेला होता. येत्या बैठकीत याबद्दल नेमका काय निर्णय होतो ते पुढच्याच आठवड्यात कळेल.

**फेडची दर कपात एवढी महत्त्वाची का ?**

गेल्या आठवड्यात अमेरिकेने केलेल्या व्याजदर कपातीचे एवढे ते कौतुक कशासाठी? असा प्रश्न तुम्हाला पडला असेल, तर अमेरिकेच्या बाजारांची ताकद लक्षात घ्या. आगामी काळात घडणाऱ्या अमेरिकेतील राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीत हा मुद्दा नक्कीच चर्चेला येणार आहे. अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हने व्याजदर कपात केल्यावर अनेक विकसनशील देशातील मध्यवर्ती बँका देखील अशाच प्रकारे व्याजदर कपात करायची शक्यता आहे. आकडेवारीनुसार, अनेक देशांच्या मध्यवर्ती बँका अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हचे अनुकरण करताना दिसतात. अमेरिकेच्या मध्यवर्ती बँकेने केलेल्या व्याजदर कपातीचा थेट परिणाम डॉलरच्या आंतरराष्ट्रीय बाजारातील मूल्यावर देखील होतो. यामुळेच डॉलरचा दर नियंत्रणात ठेवण्यासाठी अनेक देशातील मध्यवर्ती बँकांना आपल्या व्याजदर धोरणामध्ये बदल करावा लागतो. दक्षिण आणि आग्नेय आशियातील अनेक देश आणि भारत यांचे आयात-निर्यातीचे आकडे अमेरिकी डॉलरच्या वाढत्या दरामुळे वर-खाली होऊ शकतात. अमेरिकेची अर्थव्यवस्था पुन्हा एकदा बाळसे धरायला लागली आहे, असे फेडरल रिझर्व्हचे अध्यक्ष जेरोम पॉवेल यांचे विधान अनेक देशांसाठी आशादायक ठरते.

# मानवतेचा दीप लावू!

आपण वर्षभर विविध सण साजरे करतो, त्यात दिवाळी सणाला विशेष महत्व आहे कारण दिवाळी हा असा एकमेव सण आहे जो आपण पाच दिवस साजरा करतो.

आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगात दिवाळी उत्साहात साजरी केली जाते म्हणूनच दिवाळीला सणांचा राजा म्हणतात. दिवाळी सारखा उत्साह इतर कोणत्याच सणात नसतो. दिवाळीत लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांच्याच उत्साहाला उधाण येते म्हणूनच गरीब असो वा श्रीमंत, राज महालात राहणारा असो वा झोपडीत राहणारा प्रत्येक जण दिवाळी सण साजरा करतो. लहान मुलांसाठी तर दिवाळी म्हणजे पर्वणीच असते. शाळेला सुट्टी, नवे कपडे, नव्या वस्तू, किल्ला बनवणे, फटाके उडवणे, मिठाई, फराळ, मामाच्या गावाला जाणे अशा सर्व आवडत्या गोष्टी फक्त दिवाळीत करता येतात. दिवाळी म्हणजे लहान मुलांची चंगळ. केवळ लहान ममुलेच नाही तर भावा - बहिणींचा देखील हा आवडता सण कारण दिवाळीतच भाऊबीज हा बहीण - भावांचा आवडता सण येतो. सासरी असलेली बहीण भावाला ओवळण्यासाठी दिवाळीत आवर्जून माहेरी येते. दिवाळी हा आबालवृद्धांचा आवडता सण.

दिवाळी सण म्हणजे प्रकाशाचा सण, दिव्यांचा सण. दिवाळीच्या पाच दिवसांच्या काळात आकाशकंदील, पणत्या, रांगोळी, नवी खरेदी, नव्या वस्तू, नवे कपडे, फटाके यांची रेलचेल. आताही या वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारपेठा फुलून गेल्या आहेत. २०२० आणि २०२१ या दोन वर्षात कोरोनाने जगभर धुमाकूळ घातला होता त्यामुळे या दोन वर्षात लोकांना मनासारखी दिवाळी साजरी करता आली नव्हती. कोरोनामुळे अनेकांचा रोजगार हिरावला गेला त्यामुळे अनेकांनी साधेपणाने दिवाळी साजरी केली होती. सुदैवाने यावेळी दिवाळीवर कशाचेही सावट नसल्याने लोकांना दिवाळी मनासारखी साजरी करता येणार आहे. त्यामुळे लोकांच्या उत्साहाला उधाण आले आहे. या वर्षी महागाई वाढली असली तरी दिवाळीचा उत्साह कमी झालेला नाही उलट वाढलाच आहे. हा उत्साह पुढे देखील असाच कायम राहणार आहे कारण दिवाळी हा आनंदाचा, उत्साहाचा, प्रसन्नतेचा उत्सव आहे.

दिवाळी म्हणजे आनंदाचा दीपोत्सव.....!

बाहेर प्रकाशाचे दिवे पेटवायचे आणि हृदयातून ज्ञानाचे दिवे प्रज्वलित करायचे. अंतःकरणात अज्ञानाचा, विषमतेचा, अहंकाराचा अंधार असेल तर तो दूर करायच. ज्या प्रमाणे आकाशकंदील, पणत्या लावून बाहेरील अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते तसेच आपल्या अंतःकरणात असलेल्या अवगुणांचा अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते. प्रत्येक मनुष्याने शुभ चिंतन करून, शुभ विचार मनात आणून, शुभ विचार प्रकट करून जीवन प्रगल्भ आणि समृद्ध करावे हाच संदेश दिवाळी देते.

जीवनातून आसुरी शक्तीचा पराभव करण्यासाठी दैवी शक्तीचा वापर करावा. मनवाची सर्व धडपड जीवनात सुख आणि आनंद मिळवण्यासाठीच चाललेली असते. दुःख भोगल्याशिवाय सुखाची किंमत कळत नाही हे तत्वज्ञान सांगण्यासाठी ठीक; मात्र दुःखाची अनुभूती घेण्यास कोणालाही आवडत नाही. मनुष्य स्वभावातील हा स्थायीभाव ओळखूनच भारतीय संस्कृतीत सणांची निर्मिती केलेली असावी याचे भान ठेवूनच प्रत्येकाने सण साजरे करावेत.

गरीब, कष्टी, दीन, दुबळे, वंचित असा मोठा दुःखी वर्ग समाजात आहे. आपल्या घरी दिवाळी साजरी करताना त्यांच्याही घरी आनंदाचा एक दिवा लावावा म्हणजे त्यांच्या चेहऱ्यावर देखील आनंदाची रेषा पसरेल. या दुःखी, कष्टी लोकांच्या चेहऱ्यावर हास्य पसरवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्यच आहे. साने गुरुजी म्हणतात त्याप्रमाणे बाहेर अनंत दिवे पाजळून दिवाळी येत नसते. हृदयात प्रेमाच्या, मानवतेच्या पणत्या लावून आनंदाची उधळण करणाऱ्या या सणातून आपल्या जीवनात प्रकाश आणू या! अशी दिवाळी साजरी झाली तरच खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी झाली असे म्हणता येईल अन्यथा नाही!

चला तर मग दीन दुबळ्यांचे दुःख वाटून घेऊ, मानवतेचा ओलावा देऊ, त्यांच्या पाठीवर प्रेमाचा हात फिरवू, त्यांच्या जीवनात सौख्य निर्माण करू. आपल्या ताटातील खाणे याला प्रवृत्ती म्हणतात, दुसऱ्याच्या ताटातील ओरबाडणे याला विकृती म्हणतात तर आपल्या ताटातील दुसऱ्याला देणे याला संस्कृती म्हणतात. चला तर मग आपण या दिवाळीच्या निमित्ताने आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न करू.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## आगरी महिला शक्ती प्रतिष्ठान आगासन दिवा तर्फे दिवाळी संध्या कार्यक्रमाचे आयोजन



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.३१, दिवा (ठाणे) :** दिव्यात आगरी महिला शक्ती प्रतिष्ठान आगासन दिवा तर्फे दिवाळी सध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी संदेश व राजेश पाटील प्रस्तुत सुगम सागित व सत्यनारायणाची महापूजाचे आयोजन करण्यात आले होते.

लकी ड्रॉ मुळे अनेकांनी बक्षिसाची लयलूट केली. या प्रसंगी मा. आमदार राजू दादा पाटील, समाजसेवक विनोद पाटील, मा. आमदार सुभाष भोईर व त्याच्या पत्नीने सुध्दा उपस्थिती लावली होती. तसेच अनेक मान्यवरांनी, ग्रामस्थांनी, मोठ्या संख्येने महिलांनी उपस्थिती लावली होती. मिलिंद नगर, आगासन फाटक, कर्णिका गॅलेक्सी जवळ, दिवा-आगासन रोड, दिवा या ठिकाणी हा कार्यक्रम पार पडला.

गायक राजू सरपे, सचिन मोहिते, गायिका कोमल धोंडे रेशमा आवटे वादक प्रकाश सानप, शैलेश सुर्वे शैलेश पाटोळे रवी पवार, साऊंड सिस्टम प्रशांत काळे हा कार्यक्रम पार पडण्यासाठी या सर्वांनी साथ दिली.

### लक्ष्मी वारस...

पवित्र शुभ दायक
अश्विन वद्य अवस
महत्व पूर्ण दिवाळी
लक्ष्मी पूजन दिवस

बहरला रे समृध्दीने
अखिल प्रदेशउद्गस
लक्ष्मीप्रकटे साक्षात
कथा सांगती सुरस

स्वागत करे सुहास्य
नको मातेचा विरस
शुचिर्भूत तन मनही
स्वच्छता अतिसरस

आईला नावडे ईर्षा
उगा अनाठाई हवस
सत्छिलसदाचारपूर्ण
स्नेह भाव हो सकस

चंचल लक्ष्मी स्थिरवे
विसरावे वैर आकस
सुवर्ण वर्षाव होईलं
वृत्ती नसो हिणकस

उचीत विनियोग करे
तो लक्ष्मी पुत्र औरस
औदार्य असो वृत्तीत
सक्षम शोभेल वारसे

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

### कुरबूर...

प्रत्येक पक्षांमध्ये
ये नाराजीचा सूर
दिलेनाही तिकीट
बदले सगळा नूर

अपेक्षा अंतरीची
चिमणीउडते भुर्र
काय झालेपक्षाले
काअंतस्थ कुरबूर

मिळेलं एबी फॉर्म
रे कार्यकर्ते आतूर
नाव निघाले दुसरे
दिली हातावर तूर

ऐनवेळी घात पात
का होऊ न फितूर
सु ग्रास भोजनात
रे कालवता धत्तुर

का नकारे तिकीट
कारण थातुरमातुर
जुंपले आम्हांकामा
पक्षश्रेष्ठी भले चतूर

पुढल्यावेळीनक्की
वाजवा मधूर संतूर
फसले बसले भोळे
चपलख बसे मंतूर

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# जगभरात बचतीचा प्रचार...

जागतिक बचत दिवसाची स्थापना दि.३१ ऑक्टोबर १९२४ रोजी इटलीतील मिलान येथे पहिल्या आंतरराष्ट्रीय बचत बँक काँग्रेस- वर्ल्ड सोसायटी ऑफ सेव्हिंग्ज बँक्स दरम्यान करण्यात आली. इटालियन प्रोफेसर फिलिपो रविझा यांनी हा दिवस काँग्रेसच्या शेवटच्या दिवशी आंतरराष्ट्रीय बचत दिवस

म्हणून घोषित केला. थ्रिफ्ट काँग्रेसच्या ठरावांमध्ये जागतिक काटकसरी दिन हा दिवस जगभरात बचतीच्या प्रचारासाठी समर्पित करण्याचा निर्णय घेण्यात आला. काटकसरीला चालना देण्याच्या त्यांच्या प्रयत्नांमध्ये , बचत बँकांनी शाळा, पाद्री, तसेच सांस्कृतिक, क्रीडा, व्यावसायिक आणि महिला संघटनांच्या पाठिंब्याने काम केले.

**पोर्सिलेन पिगी बँक, जर्मनी :** सन १९७०पासून २९ देशांच्या प्रतिनिधींना जगभरातील लोकांच्या मनात बचत करण्याचा विचार आणायचा होता आणि त्याची अर्थव्यवस्था आणि व्यक्तीशी संबंधितता होती. जागतिक बचत दिवस सामान्यतः ३० ऑक्टोबर रोजी आयोजित केला जातो ज्या देशांमध्ये हा दिवस सार्वजनिक सुट्टी असतो, कारण बँका खुल्या ठेवण्याची कल्पना आहे, जेणेकरून लोक त्यांच्या बचती त्यांच्या खात्यात हस्तांतरित करू शकतील.

जागतिक काटकसर दिनाची कल्पना कशातूनच जन्माला आलेली नाही. जीवनाचा उच्च दर्जा मिळविण्यासाठी आणि अर्थव्यवस्था सुरक्षित करण्यासाठी पैसे वाचवण्याच्या कल्पनेला वचनबद्ध असलेल्या दिवसांची काही उदाहरणे आहेत, उदाहरणार्थ स्पेनमध्ये जिथे सन १९२१मध्ये पहिला राष्ट्रीय काटकसर दिवस साजरा करण्यात आला किंवा युनायटेडमध्ये राज्ये. जर्मनीसारख्या इतर देशांमध्ये, सन १९२३च्या जर्मन आर्थिक सुधारणांमध्ये त्यांच्यापैकी बऱ्याच जणांनी बचत गमावल्यामुळे बचतीवरील लोकांचा आत्मविश्वास पुनर्संचयित करावा लागला .

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक काटकसरीचा दिवस चालू राहिला आणि सन १९५५ ते १९७० या काळात तो लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचला. काही देशांमध्ये ही व्यावहारिकदृष्ट्या एक खरी परंपरा बनली. ऑस्ट्रियामध्ये उदाहरणार्थ, सेव्हिंगचे अधिकृत शुभंकर, तथाकथित स्पेरेफ्रोह- लिट. हॅपी सेव्हर, किंवा त्याऐवजी आनंदाने बचत करा! प्रजासत्ताक राष्ट्राध्यक्ष आणि अगदी रस्त्यापेक्षा ब्रँड जागरुकतेची उच्च पातळी गाठली. त्याचे नाव देण्यात आले. सन १९७०च्या दशकात स्पेरेफ्रो-जर्नल, तरुण लोकांसाठी एक शैक्षणिक मासिक, ४ लाख प्रतींचा प्रसार झाला. आजकाल जागतिक बचत दिनाचे आयोजन करणाऱ्या बँकांचे लक्ष विकसनशील देशांवर केंद्रित आहे, जिथे बरेच लोक बँकिंग रहित आहेत. या देशांमध्ये बचत वाढवण्यात बचत बँका महत्त्वाची भूमिका बजावतात, जसे की गरीबांच्या बचत खात्यांची संख्या दुप्पट करण्यासाठी अशासकीय संस्थांसोबत काम करणे यासारख्या काही मोहिमा आणि उपक्रमांसह प्रयत्नशील आहेत.

आज 'जागतिक बचत दिन'. इटालियन प्राध्यापक 'फिलिपो रॅव्हिझा' यांनी हा दिवस 'आंतरराष्ट्रीय बचत दिन' म्हणून जाहीर केला. दि.३१ ऑक्टोबर १९२४ रोजी हा दिवस मिलानो, इटली येथील पहिल्या 'आंतरराष्ट्रीय काँग्रेस बचत बँक दरम्यान स्थापित करण्यात आला. जागतिक बचत दिन हा जगभर ३१ ऑक्टोबरला साजरा केला जातो. भारतामध्येही पूर्वी हा दिवस ३१ ऑक्टोबरलाच साजरा होत असे. परंतु १९८४ साली दिवंगत पंतप्रधान इंदिराजी गांधी यांचे ३१ ऑक्टोबरलाच निधन झाल्यामुळे त्यानंतर भारतामध्ये जागतिक बचत दिन ३० ऑक्टोबरला साजरा केला जाऊ लागला. प्रथम वर्ल्ड सेविंग डे सन १९२५मध्ये साजरा करण्यात आला. त्यात स्पेन व अमेरिकेत प्रथम राष्ट्रीय बचत दिन साजरा केला गेला. चांगले जीवनमान मिळविण्यासाठी आणि अर्थव्यवस्थेची घडी सुरळीत चालण्यासाठी पैसे वाचवणे महत्वाचे आहे. त्याच अनुषंगाने जागतिक बचत दिवस अनेक देशांमध्ये खूप लोकप्रिय आहे आणि या आकर्षणाचे कारण म्हणजे बचत करण्यामध्ये सहसा अनेक अडथळे असतात.

जागतिक बचत दिन आपल्याला नियमित बचत करण्याचे फायदे सांगतो. बचत एखाद्या व्यक्तीस एखादा व्यवसाय सुरू करणे, चांगल्या आरोग्य सेवेचा लाभ घेणे, चांगले शिक्षण मिळविणे किंवा घर खरेदी करणे यासारख्या गोष्टींमध्ये मदत करतो. विल रॉजर तर असं म्हणतात, कर्ज काढून उद्याच्या पगारावर जगणाऱ्या अभिनेत्याच्या संगती पेक्षा, कालच्या बचतीवर भागवणाऱ्या द्वारपालची संगत मी पसंत करेन. त्यामुळे शिक्षण, घर, वृद्धापकाळ अशा कोणत्याही कारणासाठी तुम्हाला पैसा लागणार नसेल तरी निदान तुमच्या आत्मविश्वासासाठी तरी तुम्ही बचत केलीच पाहिजे. तुमच्या बचतीच्या स्थितीवरून तुमची समाजातली पत ठरणार आहे, हे नक्की!

**!! आंतरराष्ट्रीय बचत दिनानिमित्त सर्वांना सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!**
**- संकलन व सुलेखन -**
**श्री.कृष्णकुमार निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# मतदारांसाठी मतदान केंद्रावर सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करा - निरीक्षकांकडून आढावा

## मोठ्या संख्येने मतदान करण्याचे आवाहन

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३१, नांदेड :** नांदेड लोकसभा पोटनिवडणूक व नांदेड विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये निवडणूक आयोगाने सुचवल्याप्रमाणे सर्व सुविधा उपलब्ध करा. हिवाळ्यातील छोटा दिवस बघता प्रत्येक मतदान केंद्रावर आवश्यक प्रकाश यंत्रणा असावी, असे आवाहन निवडणूक निरीक्षकांनी गुरुवार, दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी केले. नांदेड जिल्ह्यातील लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी आलेल्या सामान्य, खर्च आणि पोलीस निरीक्षकांची एकत्रित बैठक आज नांदेड विश्रामगृहामध्ये झाली. या बैठकीला बी. बाला माया देवी (भाप्रसे), शेलेंद्रकुमार (भाप्रसे), पल्लवी आकृती (भाप्रसे), रण विजय यादव (भाप्रसे), कालु राम रावत (भापोसे), मृणाल कुमार दास (आयआरएस), मयंक पांडे (आयआरएस), ए.गोविंदराज (आयआरएस) त्यांच्यासोबतच जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, म हानगरपालिका आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे, अतिरिक्त जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगांवकर, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त जिल्हाधिकारी संदीप माळोदे, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, निवडणूक उपजिल्हाधिकारी राजकुमार माने, याशिवाय या निवडणुकीमध्ये जबाबदारी सोपविण्यात आलेले प्रत्येक विभागाचे नोडल अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी यावेळी निवडणुकी संदर्भात केलेल्या उपाययोजना व निवडणूक आयोगाने केलेल्या सूचनेनुसार जिल्ह्यातील केलेल्या तयारीचा आढावा सादर केला. जिल्ह्यातील संवेदनशील केंद्र, यापूर्वी दाखल झालेले गुन्हे, आतापर्यंत जिल्ह्यामध्ये दाखल झालेली जानमालाची जप्ती, कर्मचाऱ्यांची उपलब्धता मतदान व मतमोजणी केंद्रांची रचना व तयारी याबाबतचा एकूण आढावा सादर केला.

जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी देखील यावेळी जिल्ह्यात आलेल्या अतिरिक्त पोलीस दलाच्या कुमकची माहिती दिली.तसेच बंदोबस्त व तैनाती संदर्भातील माहिती दिली.आंतरजिल्हा व आंतरराज्यीय सीमा लक्षात घेता. करण्यात आलेली नाकाबंदी व तपासणी पथकांच्या कार्याबाबत ही माहिती दिली.

निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी आदर्श आचारसंहितेच्या कडकपालना संदर्भात जिल्ह्यामध्ये सुरू असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. तर उमेदवारांकडून विविध स्तरावर एकदा उमेदवारी निश्चित झाल्यानंतर होणाऱ्या खर्चाबाबत आयोगाच्या सूचनेनुसार कशा पद्धतीने निगराणी राखली जात आहे. याबाबतची माहिती महानगरपालिकेचे मुख्य लेखा अधिकारी डॉ. जनार्दन पक्वाने यांनी दिली. राज्य उत्पादन शुल्क अधिकारी तसेच विविध विभागाच्या प्रम ुखांकडून यावेळी आढावा सादर करण्यात आला.

निवडणूक निरीक्षकांनी यावेळी आपल्या काही सूचना अधिकाऱ्यांना केल्या. मात्र मोठ्या संख्येने मतदान व्हावे, यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले तसेच बंदोबस्तासाठी येणारे विविध दलातील पोलीस कर्मचारी त्यानंतर मतदान केंद्रावर येणारे दिव्यांग व्यक्ती हिवाळा असल्यामुळे प्रत्येक केंद्रावर सायंकाळची दिवाबत्तीची उपाययोजना, बहिष्कार असणाऱ्या गावांची समजूत घालणे, व अन्य काही महत्त्वपूर्ण सूचना यावेळी निरीक्षकांनी केल्या. जिल्ह्यातील समस्त मतदारांना यावेळी निरीक्षकांनी दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या असून मोठ्या संख्येने मतदान करण्याच्या आवाहन ही केले आहे.

# थोडक्यात

## कै.माधवराव काणे यांचा २८ वा.स्मृतीदिन कार्यक्रम संपन्न

**अक्षराज : हरी कापसे**



**दि.३१, तलासरी (पालघर) :** विश्व हिंदू परिषद संचालीत वनवासी कल्याण केंद्र तलासरी प्रकल्पात कै.म ाधवराव काणेर यांचा २८वा.स्मृतीदिन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी कार्यक्रम च्या मंचावर प्रमुख पाहुणे पालघर जिल्हा सघचालक नरेश मराड होते. प्रमुख वक्ते राजेश कुटे (धर्मजागरण संयोजक पालघर), पालघर लोकसभेचे नवनिर्वाचित तरुण खासदार डॉ. हेमंतसवरा, प्रकल्पाचे माधव बर्वे, लक्ष्मणदादा खरपडे इत्यादी उपस्थित होते. यावेळी मंचावरील पाहुण्याचा सत्कार माधव बर्वे यांनी खासदार हेमंत सवरा व प्रमुख वक्ते राजेश कुंटे यांचा सत्कार भारतमातेची प्रतिमा, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि अहिल्याबाई होळकर यांचे पुस्तक देऊन करण्यात आला. तर विशेष सत्कार तलासरी प्रकल्पाचे पालक उदयजी कुलकर्णी आणि सहीताताई कुलकर्णी यांनी २ वर्षे प्रकल्पात सेवा दिल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ.हेमत सवरा आणि राजेशकुंटे यांनी उपस्थितांना कै. माधवराव काणे विषयी खुप छान मार्गदर्शन केले. याच वेळी दुसऱ्या धर्मात प्रवेश केलेल्या ६० आदिवासी जोडप्याचा पुरोहित हरेश्वर वनगा हस्ते विधिव्रत सुध्दीकरण पूजन तिलक करुन पुन्हा हिंदू धर्मात प्रवेश करविला नतर त्यांना शर्टपिस व पॅन्टपिस तसेच महिलांना साड्या वाटप करण्यात आल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमलता ताई हिने केले. माधवराव बर्वे यांनी प्रास्ताविक केले आणि लक्ष्मण दादा खरपडे यांनी कार्यक्रमाचे आभार व्यक्त केले. अशा प्रकारे सुंदर असा कार्यक्रम संपन्न झाला.

# बस स्थानक मार्फत होणार मतदार जाणीव जागृती

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३१, वर्धा :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत वर्धा जिल्ह्यामध्ये मतदान जनजागृतीसाठी विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने कारंजा बस स्थानक येथे मतदान जनजागृती साठी स्थान

प्रमुख श्री मडावी यांच्याशी चर्चा करू मतदान संदर्भात जनजागृती घोषवाक्य देण्यात आले व त्यांना आपल्या स्तरावर जनजागृती करण्याची विनंती करण्यात आली. तसेच बस स्थानकावर विविध माध्यमातून उपक्रम राबवून मतदार जनजागृती करावी. अशी ही त्यांना विनंती करण्यात आली व त्यांनी ह्या विनंतीचा मान ठेवून सांगितले की माझ्या बस स्थानकावर मी मतदान जनजागृती करण्यासाठी आपणास पूर्ण मदत करेल व या कामात मी व माझे संपूर्ण कर्मचारी सहभागी होतील असेही त्यांनी आश्वासन दिले. यासाठी तसेच स्वीपचे तालुका नोडल अधिकारी पंकज तायडे आणि त्यांची टीम यांनी परिश्रम घेतले.



**जिल्हा परिषद शाळा खडींपुरा येथे मतदान जनजागृती रांगोळी स्पर्धा आयोजन**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत वर्धा जिल्ह्यामध्ये मतदान जनजागृतीसाठी शाळांमध्ये विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने जिल्हा परिषद शाळा खडींपुरा येथे मतदान जनजागृतीसाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले व मतदान संदर्भात जनजाणीव करण्यात आले. यामध्ये शाळेतील सर्व विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या रांगोळी स्पर्धेच्या माध्यमातून गावातील मतदारांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृती संदर्भात विविध प्रकारच्या रांगोळी स्पर्धेमधून विद्यार्थ्यांनी निवडणूक प्रक्रिया विषयीची माहिती करून देण्यात आली तसेच लोकशाहीमध्ये निवडणुकांचे आणि मतदानाचे महत्त्व यासंदर्भात विद्यार्थ्यांना सजत करण्यात आले या रांगोळी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक विद्यार्थी तसेच स्वीपचे तालुका नोडल अधिकारी पंकज तायडे यांनी परिश्रम घेतले.

**जिल्हा परिषद शाळा मेटहिरजी येथे मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत वर्धा जिल्हामध्ये मतदान जनजागृतीसाठी शाळांमध्ये विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने जिल्हा परिषद शाळा मेटहिरजी तालुका कारंजा येथे मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले व मतदान संदर्भात जनजाणीव करण्यात आले. यामध्ये शाळेतील सर्व विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या रॅलीच्या माध्यमातून गावातील मतदारांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृती संदर्भात विविध घोषणा दिल्या. रॅलीच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रिया विषयीची माहिती करून देण्यात आली तसेच लोकशाहीमध्ये निवडणुकांचे आणि मतदानाचे महत्त्व यासंदर्भात विद्यार्थ्यांना सजत करण्यात आले. या रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक विद्यार्थी तसेच स्वीपचे तालुका नोडल अधिकारी पंकज तायडे यांनी परिश्रम घेतले.

## ठाण्यातील दिवाळी पहाट कार्यक्रमात नवमतदारांनी, नागरिकांनी मतदानाचा केला संकल्प

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, ठाणे :** दिवाळीत जसे प्रत्येक घरात दीप प्रज्वलन केले जाते. तसेच प्रत्येक नागरिकाने आपल्या मताचा दीप लोकशाहीच्या निवडणुकरुपी उत्सवात लावावा. त्यातून देशाचे भवितव्य अधिक उज्वल, पारदर्शक आणि न्याय होईल, असा संदेश देत तलावपाळी येथे आयोजित दिवाळी पहाट कार्यक्रमात मतदारांनी मतदान करण्याचा संकल्प केला आणि शपथ घेतली. तलावपाळी परिसर येथे आयोजित दिवाळी पहाट कार्यक्रमात १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती उर्मिला पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान जनजागृती अभियान राबविण्यात आले.भारतीय राज्यघटनेने मला मतदान करण्याचा अधिकार दिला आहे. त्याचा कोणत्याही परिस्थिती वापर करेन. मतदान करून उमेदवार निवडणे माझी राष्ट्रीय जबाबदारी आहे. देशहिताकरिता जनतेच्या इच्छा आकांक्षा पूर्ण करू शकणाऱ्या सर्वोत्तम उमेदवाराची निवड करण्यासाठी माझ्या कुटुंबातील सदस्यांना, परिचितांना मतदान करण्यासाठी प्रेरित व प्रोत्साहित करीन. कोणतीही भीती वा लालसेपोटी मतदान करणार नाही, असा संकल्प उपस्थित सर्व मतदारांनी केला.युवा वर्गाने वेशभूषेच्या माध्यमातूनराष्ट्राच्या हितासाठी करायचं मतदान.., एकतेने एकजुटीने गाजवूया मैदान.., लोकशाहीचा करूया सन्मान.., १०० टक्के करायचं मतदान...अशी आगळीवेगळी वेशभूषा मतदार जागृती सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. नवमतदार तरुणाईला, मतदानाचा हक्क न बजावणाऱ्या मतदारांना मतदानाचे महत्त्व पटवून मतदार जागृती केली जात होती.लोकशाहीमध्ये प्रत्येकाला मतदानाचा अधिकार आहे. याचा वापर योग्य पद्धतीने करण्याची जबाबदारी प्रत्येक मतदाराची आहे. कोणत्याही अमिषाला बळी न पडता योग्य उमेदवारास मत देऊन आपले शहर, राज्य आणि देशाच्या विकासात हातभार लावावा आणि दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी प्रत्येकाने आपले राष्ट्रीय कर्तव्य बजवावे, असे आवाहन स्वीप टीमकडून मतदारांना केले जात आहे.

# केंद्रीय निवडणूक निरिक्षक यांनी घेतला विधानसभा निवडणूक पूर्वतयारीचा आढावा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, जालना :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमिवर जालना जिल्हा प्रशासनाने निवडणूकीच्या अनुषंगाने चांगली पूर्वतयारी केलेली असुन, ही निवडणूक प्रक्रिया निष्पक्षपणे आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक प्रक्रियेतील सर्व अधिकारी - कर्मचारी यांनी त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या गांभिर्यपूर्वक पार पाडाव्यात. असे निर्देश १०१-जालना, १०२-बदनापूर (अ.जा.) आणि १०३ भोकरदन विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निरीक्षक (सामान्य) वेद पती मिश्र यांनी यावेळी दिले. येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल सभागृहात आयोजित विधानसभा निवडणूकीच्या पूर्वतयारीचा आढावा बैठकीत श्री. मिश्र हे बोलत होते. यावेळी ९९-परतूर आणि १००-घनसावंगी विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निरिक्षक (सामान्य) श्री. नवीन, निवडणूक निरीक्षक (पोलीस) झेड ॲन विजया, निवडणूक निरीक्षक (खर्च) देव प्रकाश बमणावत जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रवार, अपर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, बीएसएफचे अजयकुम ार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, उपजिल्हा निवडणुक अधिकारी शशिकांत हदगल यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी श्री. मिश्र म्हणाले की, जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांच्या टीमने विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने सर्व प्रक्रीयेची पुर्वतयारी खुप चांगल्या प्रकारे तयारी केलेली आहे. परंतू आता या पुर्वतयारीची प्रत्यक्षात योग्य अंमलबजावणी करणे आवश्यक असून, त्यासाठी सर्वांनी योग्य नियोजन करत आपल्या जबाबदारी पार पाडाव्यात. आपण आता निवडणूकीच्या महत्वाच्या टप्प्यावर पोहचलो असून, सर्वांनी गांभिर्याने निवडणूकीचे काम करावे. सर्व निवडणूक अधिकाऱ्यांनी आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांना निवडणूकीच्या अनुषंगाने चांगल्या प्रकारे प्रशिक्षित करावे. पोस्टल मतदानाचे योग्य नियोजन करावे. तसेच भारत निवडणूक आयोगाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रत्येक मतदान केंद्रावर मूलभूत सुविधा उपलब्ध असणे बंधनकारक आहे. यात ज्येष्ठ आणि दिव्यांग मतदारांसाठी रॅम्प, व्हिलचेअर, मतदारंचे उन्हापासून संरक्षणासाठी शेडची व्यवस्था, वैद्यकीय उपचार किट, मदत कक्ष, पिण्याचे पाणी, प्रसाधन गृह, आदीं सुविधा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आपल्या मतदार संघात आहेत का ? याची खात्री करुन घ्यावी. प्रामुख्याने ग्रामीण भागातील मतदान केंद्रावर आवश्यक सोयी-सुविधा आहेत का ? ज्या क्रिटीकल मतदान केंद्रावरुन वेबकास्टींग होणार आहे तेथील इंटरनेट सुविधा सुरळीत राहील याची काळजी घ्यावी. तसेच दूरस्थसह इतर सर्व मतदान केंद्राच्या मार्गाची आणि संपर्क व्यवस्थेची देखील तपासणी करुन ठेवावी. ज्याठिकाणी त्रुटी आहेत त्यासुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश संबंधीत यंत्रणेला निवडणूक निरिक्षक (सामान्य) श्री. मिश्र यांनी यावेळी दिले.निवडणूक कालावधीत मतदार संघात प्रसारीत होणाऱ्या राजकीय पेड न्यूज आणि राजकीय पुर्वप्रमाणिकरण न केलेल्या जाहिराती, तसेच सोशल मिडीयावरील जाहिरातीवर माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीने (एमसीएमसी) लक्ष ठेवावे. तसेच संशयीत पेड न्युज किंवा जाहिराती प्रसारित झाल्यास संबंधीत उमेदवारास खुलासा करण्याची नोटीस देण्यात यावी. तसेच एफएसटी, एसएसटी, व्हीएसटी आणि व्हिव्हिटी भरारी पथकांनी वेळोवेळी आपली स्थाने बदलून तपासणी करावी. निवडणूकीसाठी नियुक्त केलेल्या सर्व पथकांनी निवडणूक प्रक्रिया निष्पक्षपणे पार पाडावयाची आहे. मतदारांमध्ये जनजागृती करत, मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याच्या सुचना ही श्री. मिश्र यांनी यावेळी दिल्या. श्री. नविन यावेळी म्हणाले की, विधानसभा मतदारसंघातील निवडणुकांसाठी सर्व यंत्रणांनी निवडणूक प्रक्रिया शांततेत व नि:पक्षपातीपणे पार पाडण्यासाठी आपल्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी गांभिर्यपूर्वक पार पाडावी. विधानसभा म तदारसंघातील संवेदनशील मतदान केंद्रांवर विशेष लक्ष केंद्रीत करुन कायदा व सुव्यवस्थेबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी. आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही याची गांभीर्याने काळजी घ्यावी. यावेळी निवडणूक निरीक्षक (पोलीस) झेड ॲन विजया म्हणाल्या की, निवडणुकीच्या अनुषंगाने पोलीस विभागाने तयारी पुर्ण केली आहे. परंतु जे नियोजन केले आहे, त्यानुसार कायदा सुव्यवस्था राखण्याची योग्य अंमलबजावणी करावी. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी निवडणुक प्रक्रियेमध्ये व्यत्यय आणणाऱ्या व्यक्तींचा शोध घेवून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी. निवडणुकीच्या प्रचाराला आता मोठ्या प्रमाणात सुरुवात होणार असल्याने विनापरवाना प्रचार करणाऱ्या वाहनांवर नियमानुसार कारवाई करावी. निवडणूक खर्च निरीक्षक श्री. बमणावत यांनी खर्च पथकांनी विविध माध्यमातून होणाऱ्या बेकायदेशीर सर्व बाबींची दैनंदिन नोंद ठेवून बारीक लक्ष ठेवावे. निवडणूक कालावधीत अर्थिक व मद्याचा गैरव्यवहार होण्याची शक्यता असल्याने मतदारसंघातील वाहनांची कसून तपासणी करावी, तसेच अशी वाहने आढळल्यास त्यांच्यावर कडक कारवाई करावी. उमेदवारांना ४० लाखांची खर्चाची मर्यादा ठेवण्यात आली आहे, त्यावर देखील खर्च पथकाने दैनंदिन लक्ष ठेवावे, निवडणूक कालावधीत जिल्ह्यात होत असलेली मद्य विक्रीवर देखील बारकाईने लक्ष ठेवावे. एफएसटी, एसएसटी, व्हीएसटी आणि व्हिव्हिटी भरारी पथकांनी गांभिर्याने तपासणी करण्याचे निर्देश ही श्री.बमणावत यांनी यावेळी दिले.प्रारंभी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ पार्श्वभूमीवर जिल्हा माहिती कार्यालय, जालना यांच्यामार्फत तयार करण्यात आलेल्या जालना जिल्हा विधानसभा मतदार संघ निवडणूक-२०२४ पूर्वपिठीकेचे केंद्रीय निवडणूक निरीक्षक यांच्या हस्ते आज प्रकाशन करण्यात आले. तसेच निवडणूक दिव्यांग आयकॉन डॉ. निलेश मदरे यांनी मतदान जनजागृतीबाबत आपले म नोगत व्यक्त केले.जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पूर्वतयारीचे तर पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी कायदा सुव्यवस्थेच्या तयारीची सादरीकरणद्वारे सविस्तर माहिती सादर केली.यावेळी बैठकीस सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, नोडल अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्यासह संबंधीत विभाग प्रमुख यांची उपस्थिती होती.

## निवडणूक निरीक्षक यांनी निवडणूक कामाची केली पाहणी



**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.३१, हदगांव (नांदेड) :** निवडणूक निरीक्षक (सामान्य) शैलेंद्र कुमार यांनी हदगाव विधानसभा मतदार संघातील निवडणूक विषयक कामकाजाचा आढावा घेवून काही मार्गदर्शक सुचना केल्या शैलेंद्र कुमार यांचा स्थानिक भ्रमणध्वनी क्रम ांक ७४९९१२७२६५ हा आहे. ते ८३ किनवट व ८४ हदगाव विधानसभा मतदार संघासाठी निवडणूक निरीक्षक म्हणून काम पाहत आहेत. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी अविनाश कांबळे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सुरेखा नांदे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी पल्लवी टेमकर, नायब तहसीलदार मुगाजी काकडे आदी उपस्थित होते.

## सरदार वल्लभभाई पटेल व प्रियदर्शनी इंदिरा गांधी यांना नमुंमपामार्फत अभिवादन

**अक्षराज : जे. के. पोळ**



**दि.३१, नवी मुंबई :** थोर स्वातंत्र्यसेनानी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त आणि माजी पंतप्रधान प्रियदर्शनी इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त नमुंमपा मुख्यालयातील ॲम्फीथिएटरमध्ये समाजविकास विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे यांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन करून या महामानवांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रीय एकता दिवसाची शपथ तसेच दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त भ्रष्टाचार निर्मुलनाची शपथ सामूहिकरीत्या ग्रहण करण्यात आली.